


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १६, शुक्रवार २९ नोव्हेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# राणीताई लंके यांचा ईव्हिएम पडताळणीसाठी अर्ज

## ■ १८ बुथवरील मतांची पडताळणी करण्याची मागणी ■ ८ लाख ४९ हजार ६०० रूपये शुल्क जमा

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील १८ बुथवरील ईव्हिएम मशिनमधील मतदानाची पडताळणी करण्याची मागणी करणारा अर्ज महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या वतीने जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांच्याकडे गुरूवारी सुपूर्द करण्यात आला. या पडताळणीसाठी ४७ हजार ६०० रूपयांप्रमाणे १८ बुथसाठी आवष्यक असलेले ८ लाख ४९ हजार ६०० रूपये इतके शुल्क लंके यांच्या वतीने शासनाच्या कोषागारात जमा करण्यात आले आहे.**

गेल्या २३ नोव्हेंबर रोजी राज्यातील विधानसभा निवडणूकीसाठी घेण्यात आलेल्या मतदानाची मतमोजणी करण्यात आली. पारनेर-नगर मतदारसंघातील मतमोजणी करण्यात आली त्यावेळी महायुतीचे उमेदवार तथा विद्यमान आमदार काशिनाथ दाते व महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्यात चुरशीची लढत होईल काशिनाथ दाते यांनी या निवडणूकीत अल्पशा मतांनी बाजी मारली. मतमोजणीनंतर राणी लंके समर्थकांकडून ईव्हिएमच मशिनसंदर्भात शंका घेण्यात येत होत्या. खा. नीलेश लंके यांनीही दिल्ली येथे पत्रकारांशी बोलताना ईव्हिएम मशिनवर शंका उपस्थित करत पोष्टल मतदानाचा जो कल असतो तोच कल मतदान यंत्रातील मतांमध्येही असतो असा अनुभव असताना यंदाच्या निवडणूकीत हा कल कसा बदलला गेला असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला होता. या पार्श्वभुमीवर उमेदवार राणी लंके यांच्या वतीने ठराविक मतदान केंद्रावरील मतांची फेर मोजणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



### या बुथवरील मतांची होणार पडताळणी

क्र.२ नागापुरवाडी, क्र. २८ वनकुटे, क्र.३० पठारवाडी, क्र. ३८ देहरे, क्र.५० सुतारवाडी, क्र. ९२ भाळवणी, क्र.९४ भाळवणी, क्र.९५ भाळवणी, क्र.११४ वडगांव गुप्ता, क्र.११५ निंबळक, क्र.११७ निंबळक, क्र.२६५ सुपा, क्र. २६७ सुपा, क्र.२६८ सुपा, क्र.२९३ वाळवणे, क्र. ३१० निघोज, क्र ३१३, निघोज, क्र. ३५९ वाडेगव्हाण.

### ४५ दिवसांनी होणार पडताळणी

लोकसभा, विधानसभा निवडणूकीतील क्र.२ व क्र.३ वरील पराभूत उमेदवारांना ईव्हिएम पडताळणी करण्याचे अधिकार निवडणूक आयोगाकडून देण्यात आले आहेत. निवडणूकीचा निकाल जाहिर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत पराभूत उमेदवारांना ईव्हीएम पडताळणी करण्याची मागणी करता येते. त्यानुसार राणी लंके यांच्या वतीने गुरूवारी जिल्हाधिकाऱ्यांकडे ही मागणी करण्यात आली. निकालानंतर ४५ दिवसांनी ही पडताळणी करण्यात येणार आहे.

### या बुथवरील मतांची होणार पडताळणी कंसातील मते अनुक्रमे दाते व लंके यांची

क्र.२ नागापुरवाडी (२१९,३२७) , क्र.२८ वनकुटे (१७४,२८४) क्र. ३० पठारवाडी १३९,८५ क्र.३८ देहरे (३४६,३६२) क्र. ५० सुतारवाडी (३०१,१४३) क्र. ९२ भाळवणी (४४७ ,४१६) क्र.९४ भाळवणी ( ४५५,३८४ ) क्र. ९५ भाळवणी (५०९ ,२७६) क्र.११४ वडगांव गुप्ता (२७२ ,२८८) क्र. ११५ निंबळक (३४०,३०६), क्र. ११७ निंबळक (५३७,३४८) क्र. २६५ सुपा (३४३ ,३१३) क्र. २६७ सुपा (३२६,५५२ ) क्र. २६८ सुपा (२३८,३३०) क्र. २९३ वाळवणे (३६९,४१८) क्र.३१० निघोज (३१५,३६४) क्र.३१३ ३ निघोज (१४६,३०६) क्र. ३५९ वाडेगव्हाण (३५१, ३६६)

# धाड टाकाल तर संघटीतपणे धिंड काढू !

## आ. काशिनाथ दाते यांचा निर्वाणीचा इशारा । निघोज येथे नागरी सत्कार



निघोज : संदीप इधाटे

**माझा प्रचार केला म्हणून कान्हूरपठार येथील कार्यकर्त्यांच्या हॉटेलवर तसेच शिरापुर येथील दोन हॉटेलवर धाड टाकून गुन्हे दाखल करण्यात आले. अधिकारी कोणाच्या तरी सांगण्यावरून धाडी टाकणार असेल तर याद राखा, तुम्ही काचेच्या घरात राहता तुमची संघटीतपणे धिंड काढू असा निर्वाणीचा इशारा नवनिर्वाचित आमदार काशिनाथ दाते यांनी दिला.**

विधानसभा निवडणूकीत विजय संपादन केल्याबद्दल दाते यांचा निघोज ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. मळगंगा पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर कवाद हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, शिरापुरचे सरपंच भास्कर उचाळे, संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ, दिनेश बाबर, सरपंच चित्राताई वराळ, सुधामती कवाद, विठ्ठल कवाद, उपसरपंच माउली वरखडे, अस्लम इनामदार, विलास हारदे, मनोहर राऊत, विराज वराळ, राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखिले, रोहिदास लामखडे, रमेश वरखडे, राजाराम एरंडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, प्रचारानिमित्त कृषि मंत्री धनंजय मुंडे हे निघोज येथे आले होते. प्रचार सभेत त्यांनी केलेल्या भाषणाने प्रचारात कळस चढविला. कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला. त्यांनी त्यांच्या खास शैलीमध्ये केलेल्या भाषणामुळे तालुक्यात असलेल्या दहशतीची भीती खऱ्या अर्थाने दुर झाली. तालुक्यातील कार्यकर्त्यांवर कसा अन्याय होत आहे, हे मी गेली पाच वर्षे पाहत आहे. अनेक कार्यकर्ते तुरूंगात डांबले गेले आहेत ही दहशत रोखण्यासाठी आपण या निवडणूकीच्या रिंगणात उतरलो होतो. तालुक्याची बिघडलेली संस्कृती बदलण्यासाठी मोठया धाडसाने मी हा निर्णय घेतल्याचे दाते म्हणाले.

### बारा दिवसांत विजय

विरोधी उमेदवाराने लोकसभा निवडणूकीनंतर पाच महिन्यांत मोहटादेवी दर्शन, साडी वाटप, भजनी मंडळांना साहित्य, बचत गटांना आथक मदत अशी आमिषे दाखविली. आपण मात्र केवळ बारा दिवसांत यश संपादन केले. जनतेने माझ्यावर टाकलेल्या विश्वासास मी कधीही तडा जाउ देणार नाही. असे प्रेम हे पैशाने विकत घेता येत नाही.

**काशिनाथ दाते**
आमदार, विधानसभा

### लोकसभा निवडणूकीतील पराभवाची सल

लोकसभा निवडणूक मी माझ्या आयुष्यात विसरणार नाही. ज्या विखे कुटूंबाने पारनेर तालुक्यावर प्रेम केले. वराळ कुटूंबालाही प्रेम दिले. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून निधी कमी पडू दिला नाही. त्यांच्या निवडणूकीमध्ये आम्ही कमी पडलो. याची सल आयुष्यभर मनामध्ये राहील. लोकसभा निवडणूकीत निघोज गटात आम्ही मागे होतो. हे लिड या निवडणूकीत कमी करण्यात यश मिळाले यात समाधान आहे.

**सचिन वराळ**
अध्यक्ष, संदीप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशन

### जिकडे सत्ता तिकडे ठेकेदार !

निघोज येथे ठेकेदार व प्रतिष्ठानच्या लोकांनी धुमाकूळ घातला. जिकडे सत्ता तिकडे उदो उदो अशी ठेकेदारांची सवय आहे. आता आपली सत्ता आल तर हळू हळू निरोप देऊ लागले आहेत. त्यांनी माझ्याकडून अपेक्षा ठेऊ नये.

# महायुतीच्या नव्या सरकारमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी

## ५० वर्षांवरील नेत्यांचा पत्ता कट होण्याची शक्यता । इच्छुकांची धाकधूक वाढली

मुंबई : प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्याचे नाव आज जाहीर होण्याची शक्यता आहे. पण तत्पूर्वी, भाजपने नव्या सरकारमध्ये काही निवडक ज्येष्ठ नेते सोडले तर तरुण आमदारांना संधी देण्याचे संकेत दिलेत. यामुळे नवे सरकार अस्तित्वात येण्यापूर्वीच मंत्रिपदासाठी इच्छुक आमदारांची धाकधूक वाढली आहे.**

भाजप नेते देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार व शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांची आज दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत बैठक होणार आहे. या बैठकीत महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्याचे नाव निश्चित केले जाण्याची शक्यता आहे. तसेच संभाव्य मंत्रिमंडळाचा चेहराही यात स्पष्ट होण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपने नव्या सरकारमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे काही ज्येष्ठ नेत्यांचे पत्ते कट होण्याची भीती निर्माण



झाली आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, भाजपने भविष्यातील निवडणुकांत फायदा व्हावा या दृष्टिकोनातून आतापासूनच तयारी सुरू केली आहे. या अंतर्गत महायुतीच्या नव्या सरकारमध्ये तरुण नेत्यांना संधी दिली जाणार आहे. तरुण नेत्यांचा मार्ग मोकळा करण्यासाठी ५० वर्षांवरील आमदारांचा पत्ता कट केला जाणार आहे. यामुळे या आमदारांची धाकधूक वाढली आहे. यामुळे आज सकाळपासूनच देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर मंत्रिपदासाठी इच्छुक असणाऱ्या आमदारांची गर्दी झाली आहे. या आमदारांशी चर्चा झाल्यानंतर फडणवीस दिल्लीच्या दिशेने निघाले.

**महायुतीचा २१ - १२ - १० चा फॉर्म्युला**

सूत्रांच्या माहितीनुसार, विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर लगेचच महायुतीमध्ये मंत्रिमंडळाच्या फॉर्म्युल्यावर चर्चा सुरू झाली आहे. या चर्चेतून २१ - १२ - १० असा संभाव्य फॉर्म्युला समोर आला आहे. त्यानुसार, भाजपला सर्वाधिक २१, शिवसेनेला १२ व राष्ट्रवादी काँग्रेसला १० मंत्रिपदे मिळण्याची शक्यता आहे.

**दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक**

दुसरीकडे, अमित शहा यांच्यासोबतच्या बैठकीपूर्वी राष्ट्रवादीच्या नेत्यांची दिल्लीत प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी बैठक सुरू झाली आहे. या बैठकीला अजित पवार व सुनील तटकरेंसह पक्षाचे सर्वच ज्येष्ठ नेते उपस्थित आहेत. उर्वरीत पान ३ वर

# शरद पवारांनी आता घरी बसावे!

## राधाकृष्ण विखे पाटलांची तिखट टीका । जनाधार गमावल्याचा दावा

नगर : प्रतिनिधी

**जाणते राजे असणाऱ्या शरद पवारांनी विधानसभा निवडणुकीत आपला जनाधार गमावला. त्यामुळे आता त्यांनी राज्याचे आणखी वाटोळे न करता घरी बसावे, अशी तिखट टीका भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर निशाणा साधताना केली आहे.**



राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुंबईत पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठी घेतल्या. त्यानंतर गुरुवारी त्यांनी अहिल्यानगर येथील लोणी येथे ग्रामदैवत म्हसोबा महाराजांच्या यात्रेच्या नियोजनासाठी ग्रामस्थांसोबत बैठक घेतली. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी शरद पवारांवर टीका केली. ते म्हणाले, शरद पवार जाणते राजे आहेत. पण विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपला जनाधार गमावला. त्यामुळे आता त्यांनी घरी बसावे. त्यांनी आतापर्यंत जनता व राज्याचे खूप वाटोळे केले. यापुढे त्यांनी ते करू नये.

**उद्धव ठाकरेंना जनतेने शिक्षा दिली**

विखे पाटलांनी यावेळी आपल्या पराभवासाठी ईव्हीएमला दोष देणाऱ्या विरोधकांवरही शरसंधान साधले. ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले होते. तर सत्ताधारी महायुतीची पिछेहाट झाली होती. त्यावेळी कुणीही ईव्हीएमवर शंका उपस्थित केली नाही. ईव्हीएमवर विश्वास नाही म्हणून त्यांच्या खासदारांनी त्यावेळी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची गरज होती. तसेच निवडणूक नाकारण्याचीही गरज होती. जनमत बाजूने असले की ईव्हीएम चांगली, पण विरोधात गेले की वाईट अशी विरोधकांची गत झाली आहे.

विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर महाविकास आघाडीत एकमेकांवर खापर फोडण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे ते पळवाटा शोधत आहेत. त्यांनी आपण जनाधार गमावल्याचे मान्य करावे. उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविषयी अनेक बेताल विधाने केली. त्याची शिक्षा त्यांना जनतेने दिली आहे.

# घरकुलासाठी चार लाखांचा निधी द्या

## खा. नीलेश लंके यांची लोकसभेत मागणी



नवी दिल्ली : प्रतिनिधी

**शासनाकडून गरीब कुटूंबासाठी घरकुल उभारणीसाठी देण्यात येणारा निधी अतिशय तुटपुंजा असून शासनाने एका घरकुलासाठी किमान चार लाख रूपये निधी देण्याची आग्रही मागणी खा. नीलेश लंके यांनी संसदेच्या सभागृहात केली.**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनानिमित्त खा. नीलेश लंके हे नवी दिल्लीमध्ये असून अधिवेशनात सहभागी होत त्यांनी घरकुलांच्या प्रश्नावर सभागृहाचे लक्ष वेधले.

खा. लंके म्हणाले, प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये काही महत्वाचे बदल आवष्यक आहेत.अहमदनगर जिल्हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा आहे, परंतू घरकुलांची संख्या अत्यंत कमी आहे. महागाईचा विचार करता ग्रामीण व शहरी भागातील घरकुलांसाठी देण्यात येणारा निधी फारच तुटपुंजा आहे. घरकुलासाठी १ लाख २० हजार घरकुलासाठी, शौचालयासाठी १२ हजार रूपये, २६ ते २८ हजार मनरेगामधून असा एका घरकुलासाठी १ लाख ५८ हजार ते १ लाख ६० हजार दिले जातात. माझी मागणी आहे की कमीत कमी एका घरकुलासाठी चार लाख रूपये मिळणे अपेक्षीत आहे. घरकुलासाठी ग्रामीण भागात जागा उपलब्ध होत नाही. जागा उपलब्ध झालीच तर त्या जागेचा उतारा मिळत नाही. त्यात सुधारणा करून माझ्या सर्वसामान्य जनतेला जास्तीत जास्त घरकुले मिळावीत अशी अपेक्षा खा. लंके यांनी सभागृहात केली.



# चंदेरी

## दीपिका-रणवीरने भाड्याने दिले त्यांचे आलिशान घर!

**दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग यांनी मुंबईतील प्रभादेवी परिसरातील त्यांचा आलिशान फ्लॅट भाड्याने दिला आहे. हा फ्लॅट ब्यू मोंडे टॉवर्समध्ये २४ व्या मजल्यावर आहे आणि त्याचे मासिक भाडे ७ लाख रुपये आहे. फ्लॅटचे क्षेत्रफळ २ हजार ३१० चौरस फूट आहे.**




असे म्हणतात की हा इतका पॉश परिसर आहे की येथे सिद्धिविनायक मंदिरदेखील आहे. दीपिका, रणवीरने फ्लॅट भाड्याने देताना २१ लाख रुपयांचे डिपॉझिटही घेतले आहे. या फ्लॅटसाठी तीन कार पार्किंग देखील आहे आणि भाडे करार १३ नोव्हेंबरलाच झाला. ३६ महिन्यांसाठी फ्लॅट भाड्याने देण्यात आला आहे. पहिल्या १८ महिन्यांसाठी ७ लाख रुपये आणि उर्वरित १८ महिन्यांसाठी ७ लाख ३५ हजार रुपये भाडे निश्चित करण्यात आले आहे. दीपिका पदुकोणचा ब्यू मोंडे टॉवर्समध्येच आणखी एक फ्लॅट आहे. याशिवाय सागर हौसिंग सोसायटीत तिचा एक अलिशान फ्लॅट आहे. जो शाहरुख खानच्या मन्नत बंगल्याजवळ आहे.

दीपिका आणि रणवीरला एक चिमुकली मुलगी आहे. ८ सप्टेंबर २०२४ रोजी दीपिकाने या मुलीला जन्म दिला होता. रणवीर सिंगने बँड बाजा बारात या चित्रपटातून अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं. राम-लीला, बाजीराव मस्तानी, पद्मावत, सिम्बा आणि गली बॉय यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमध्ये काम करत रणवीरने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलंय. उत्तम अभिनयकौशल्य, हटके स्टाईल आणि फॅशन ही रणवीरची खासियत आहे. इंडस्ट्रीतील यशामुळे रणवीर सिंगच्या कमाईतही सातत्याने वाढ होत आहे. रिपोर्टनुसार, त्याची एकूण संपत्ती सुमारे २४५ कोटी रुपये आहे.

प्रत्येक चित्रपटासाठी रणवीर ३० कोटी रुपयांचं मानधन घेतो. त्यामुळे रणवीर बॉलिवूडमधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या अभिनेत्यांपैकी एक आहे. त्याव्यतिरिक्त ब्रँड अ‍ॅन्डॉर्समेंटमुळे त्याच्या उत्पन्नात वाढ होते. अनेक जाहिरातींमधूनसुद्धा रणवीर भरघोस कमाई करतो. मात्र, रणवीरच्या एकूण संपत्तीचा विचार केल्यास दीपिकाच्या संपत्तीपेक्षा त्याची कमाई कमीच आहे. दीपिका पादुकोण बॉलिवूडमधील टॉप अभिनेत्रींपैकी एक असून तिची एकूण संपत्ती ५०० कोटी रुपये आहे. रणवीर सिंग आणि दीपिका पादुकोण आलिशान जीवन जगत असून त्यांचा मुंबईमध्ये ११९ कोटींचा लग्झरिअस फ्लॅट आहे. रणवीरकडे रेंज रोव्हर, अ‍ॅस्टन मार्टिन, जग्वार, मर्सिडीज-बेंझ आणि लॅम्बोर्गिनी या गाड्यांचं कलेक्शन आहे.

## ‘इमर्जन्सी’ला अखेर ग्रीन सिग्नल

**बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौतने तिच्या आगामी इमर्जन्सी चित्रपटाची रिलीज डेट जाहीर केली आहे. चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाने मान्यता दिली आहे. कंगनाने देशाच्या राजकारणावर आधारित या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले आहे. चित्रपट पुढील वर्षी १७ जानेवारीला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.**



कंगनाने या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर शेअर केले असून त्यात चित्रपटाचे मुख्य कलाकारही दाखवले आहेत. अभिनेत्रीने एक्स-पोस्टमध्ये लिहिले, १७ जानेवारी २०१५, देशातील सर्वात शक्तिशाली महिलेची महाकथा आणि भारताचे नशीब बदलणारा क्षण इमर्जन्सी हा चित्रपट देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जीवनावर आधारित आहे. या चित्रपटात इंदिरा गांधी सरकारच्या काळात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीचे चित्रण करण्यात आले आहे. या चित्रपटात कंगना ही माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या भूमिकेत दिसणार आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची भूमिका श्रेयस तळपदे साकारत आहे.

# पुरुषांनी मुलींना मेकअप अन् कपड्यांमध्ये अडकवले!

### अभिनेत्री रिद्धी डोगराची विशेष मुलाखत

**अभिनेत्री रिद्धी डोगरा हिने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टीव्हीवरून केली होती, पण तिने मोठ्या पडद्यावरही आपले अभिनयाचे कौशल्य सिद्ध केले आहे. ती शाहरुख खानसोबत जवान चित्रपटातही दिसली होती. आता ती विक्रांत मॅसीच्या द साबरमती रिपोर्टमध्ये दिसली आहे. यानिमित्ताने घेतलेली तिची विशेष मुलाखत.**

रिद्धी डोगरा सध्या द साबरमती रिपोर्टमध्ये पत्रकाराच्या भूमिकेत दिसत आहे. तिने सांगितले की, यापूर्वी तिने ही ऑफर नाकारली होती. छोट्या पडद्यावरून आपल्या करिअरची सुरुवात करणाऱ्या रिद्धी डोग्राला जेव्हा OTT वर संधी मिळाली तेव्हा तिने या माध्यमातही आपली ताकद दाखवून दिली. जवान चित्रपटात शाहरुख खानच्या आईच्या भूमिकेमुळे प्रसिद्धीझोतात आलेली रिद्धी डोगरा सध्या द साबरमती रिपोर्टमध्ये पत्रकाराच्या भूमिकेत दिसत आहे. तिने सांगितले, की जेव्हा मला ‘द साबरमती रिपोर्ट’ची ऑफर आली तेव्हा मी सुरुवातीला नकार दिला होता. मी राजकीय पार्श्वभूमीतून आले आहे. अरुण जेटली (सुप्रसिद्ध राजकारणी) माझे काका आहेत, त्यामुळे त्या दिशेने जायचे नाही, असे मी ठरवले होते.



### कोणालाही मी ब्लॉक करते...

आपल्या स्पष्टवक्ते आणि बोल्ड वृत्तीमुळे रिद्धी अनेकदा ट्रोलची शिकार बनते. ट्रोल्सला ती कशी हाताळते यावर ती स्पष्टपणे म्हणते, की ट्रोल्सला इतकं महत्त्व देता येत नाही. ऑनलाइन ट्रोलिंगला इतकं महत्त्व द्यायला लागलो तर कसे व्हायचे? आज अशी अवस्था झाली आहे की प्रत्येकाच्या हातात फोन आहे आणि ते त्या फोनवर काहीही लिहू शकतात. ट्रोल्सकडे इतकं लक्ष देऊ शकत नाही. रिद्धी म्हणते, कितीवेळा असं होतं की कोणी एखादी टिप्पणी करते आणि मी त्याला फटकारण्याचा प्रयत्न करते. तेव्हा तो लगेच मागे फिरतो आणि म्हणू लागतो, अहो, आम्ही तुमचे मोठे चाहते आहोत. माफ कराकधीकधी मी अशा लोकांना ब्लॉक करते जे खूप आक्षेपार्ह गोष्टी बोलतात. मी एक स्त्री आहे म्हणून लोक माझ्याकडे तुच्छतेने पाहण्याचा प्रयत्न करतात तेव्हा मला ते सहन होत नाही. मी हजारो ब्लॉक केले आहेत. त्यांचा आपल्या वैयक्तिक जीवनावर परिणाम होऊ नये. आपण त्यांचे मनोरंजन करू नये असे मला वाटते.

### शाहरुखबद्दल म्हणाली...

किंग खानच्या जवानमध्ये शाहरुख खानच्या आईची भूमिका साकारल्यानंतर रिद्धी खूप चर्चेत आली. नुकत्याच आलेल्या द साबरमती रिपोर्ट या चित्रपटात ती विक्रांतसोबत आहे. किंग खान आणि विक्रांतसोबत काम करण्याचा अनुभव सांगताना ती म्हणते, आपल्या सर्वांसाठी शाहरुख खान हा प्रेमाचा समानार्थी शब्द आहे. पण या दोघांबद्दल बोललो तर दोघांमध्ये एक गोष्ट समान आहे की या दोघांनीही अभिनेता म्हणून सातत्य सोडले नाही किंवा त्यांनी ती गुणवत्ता सोडली नाही, ज्यामुळे लोकांची त्यांना पसंती मिळते. ती म्हणते, शाहरुख जेव्हा इंडस्ट्रीत आला तेव्हा मी लहानच होते, मी त्याच्याबद्दल काही बोलले तर ते लहान तोंडी आणि मोठी गोष्ट असेल, पण शाहरुखने स्वतःसाठी एक खास स्थान निर्माण केले आहे आणि विक्रांत देखील तेच करत आहे. आपल्या चित्रपटातून आणि कामातून तो सतत आपले स्थान पक्के करत आहे. विक्रांत हा मूळ अभिनेता आहे. त्याच्या अभिनयात एक आत्मविश्वास दिसून येतो.

### ती यशस्वी झाली असेल, तर ती नक्कीच अफेअर असावे...

टीव्हीवरून वेब सीरिजच्या दुनियेत आल्यानंतर रिद्धीने असुर, अ मॅरिड वुमन, बदतमीज दिल आणि टीव्हीएफ पिक्चर्समध्ये शक्तिशाली महिलांच्या भूमिका साकारल्या अन् या भूमिकांना मूर्त रूप दिले. वास्तविक जीवनात ती स्वावलंबी मुलगी असल्याने, मुलींना होणाऱ्या त्रासाबद्दल रिद्धी म्हणते, की मी प्रत्येक मुलीला आणि प्रत्येक महिलेला एकमेकांना सपोर्ट करायला सांगू इच्छिते. समाजाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर हा समाज पुरुषांचा आहे आणि त्यांनी अतिशय सोईस्करपणे आणि चतुराईने आपल्या सर्वांना एकमेकींच्या विरोधात उभे केले आहे. त्यांनी आम्हाला केस, मेकअप आणि कपड्यांमध्ये अडकवले आणि म्हणाले, की एकमेकींशी लढा. सोशल मीडियावर बघितले तरी हिरोच्या फोटोची तुलना कधीच कोण छान दिसते अशी केली जात नाही, पण हो, दोन नायिकांना नक्कीच विचारले जाते, कोण चांगले दिसते? आमच्या विरोधात वयाची शेमिंगही केली जाते. जिथे एखादी मुलगी यशस्वी झाली तर तिच्याबद्दल असे का बोलले जाते की तिचे कोणाशी तरी अफेअर असावे. जेव्हा जेव्हा एखादी महिला असे बोलते तेव्हा मी तिच्याशी भांडते. स्त्री ही स्त्रीची सर्वात मोठी शत्रू आहे, असेही पुरुष म्हणतात. हे देखील खरे आहे. मला असे वाटते की जर आपण महिला एकत्र राहिलो तर आपल्याला कोणीही तोडू शकणार नाही, असे रिद्धी म्हणाली.



### त्या नायिकांनी कधीच हार मानली नाही

आज केवळ ओटीटीमध्येच नाही तर चित्रपटांमध्येही महिलांचे हक्क, इच्छा आणि लैंगिकता यावर खुलेपणाने बोलले जात आहे. या बदलाबद्दल ती म्हणते, की याचे श्रेय मोठ्या प्रमाणावर ओटीटी आणि वर्ल्ड सिनेमाला जाते. जेव्हा प्रेक्षकांना ओटीटीच्या माध्यमातून जागतिक सिनेमाची ओळख झाली, तेव्हा हे लक्षात आले की जगभरात महिला-आधारित सामग्रीची कमतरता नाही. याशिवाय, या मार्गावर पहिले पाऊल टाकणाऱ्या आपल्या देशातील अभिनेत्रींची नावे मला नक्कीच घ्यायला आवडेल. विद्या बालन, प्रियांका चोप्रा, करीना कपूर अशा अनेक अभिनेत्रींनी चित्रपटांचा ट्रेंड बदलला. त्यांच्या आधी नूतन, वहिदा रहमान, नर्गिस, देविका राणी अशा अनेक दिग्गज नायिका होत्या. ज्यांनी स्त्रीवादी भूमिका केल्या, असे रिद्धी म्हणाली.

### मी जास्त राजकीय चर्चा टाळते

रिद्धी म्हणाली, की मी जास्त राजकीय चर्चा टाळते. पण नंतर निर्मात्यांनी मला टीमला येऊन भेटायला सांगितले. त्यांच्याकडे या विषयावर इतके साहित्य होते की मला माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली आणि माझ्या सर्व शंका निराधार ठरल्या. आमच्या व्यवसायात, खात्री आणि हेतू खूप महत्त्वाचे आहेत आणि मला समजले की त्यांचा हेतू सत्य बाहेर आणण्याचा होता. त्यांना ही कथा पत्रकारितेच्या दृष्टिकोनातून दाखवायची होती, जी मला खूप मनोरंजक वाटली. एक प्रकारे, माझी भूमिका उत्प्रेरकाची आहे, जी कुठेतरी प्रणालीचे प्रतिनिधित्व करते.

## ‘भागम भाग’ सिनेमाचा सिक्वेल येणार

**अक्षय कुमार, गोविंदा आणि परेश रावल या कलाकारांच्या मुख्य भूमिका असलेला ‘भागम भाग’ या चित्रपटाचा सिक्वेल प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. २००६ मध्ये प्रदर्शित झालेल्या या कॉमेडी चित्रपटाने प्रेक्षकांना पोट धरून हसायला लावले होते. आता या ब्लॉकबस्टर चित्रपटाचा अधिकृत सिक्वेल ‘भागम भाग २’ लवकरच प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होत आहे. हास्याचा तडका आणि मनोरंजनाचा धुमाकूळ पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.**

१८ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या सुपरहिट कॉमेडी चित्रपटच्या सिक्वेलची अधिकृत घोषणा निर्मात्यांनी केली आहे. गेल्या काही काळापासून या चित्रपटाच्या सिक्वेलबाबत




चर्चा सुरू होती. आता ‘भागम भाग २’ चे पटकथालेखन सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. ‘भागम भाग २’ च्या हक्कांचे हस्तांतरण ‘शेमारू एंटरटेन्मेंट’कडून ‘रोअरिंग रिव्हर प्रॉडक्शन’च्या सरिता अश्विन वर्दे यांच्याकडे करण्यात आले आहे. सरिता या चित्रपटाच्या पटकथेवरदेखील काम करत असून त्या शेमारूच्या सहकार्याने चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. या घोषणेबाबत ‘द हॉलीवूड रिपोर्टर’शी बोलताना सरिता म्हणाल्या, ‘भागम भाग’सारख्या चित्रपटाचा सिक्वेल यायला हवा असं मला वाटत होतं. योग्य वेळेची वाट पहात आम्ही हा निर्णय घेतला आणि आता हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज आहे. शेमारू एंटरटेन्मेंटचे सीईओ हिरण गडा यांनीही या सिनेमाबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, या चित्रपटाने प्रेक्षकांचं ज्याप्रकारे मनोरंजन केलं, त्याच पद्धतीने सिनेमाच्या नव्या भागातूनही प्रेक्षकांचं मनोरंजन व्हावं यासाठी आम्ही एका उत्कृष्ट टीमबरोबर काम करत आहोत ‘भागम भाग २’ हा आधीच्या भागापेक्षा अधिक ‘मॅड, क्रेझी आणि मजेशीर’असेल.’’ २०२५ च्या मध्यावर या सिनेमाचे प्रोडक्शनचे काम सुरू होईल असे बोलले जात आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, गोविंदा आणि परेश रावल यांची लोकप्रिय पात्रे पुन्हा एकत्र पाहायला मिळण्याची शक्यता आहे. ‘भागम भाग’चं दिग्दर्शन करणारे प्रियदर्शन सिक्वेलसाठी परत येणार का? याबाबत कोणतीही पुष्टी झालेली नाही. मात्र, ‘भागम भाग’च्या चाहत्यांसाठी हा सिक्वेल निश्चितच एक आनंदाची बातमी ठरणार आहे.

## ऐतराज २ येणार

प्रसिद्ध चित्रपट निर्माता सुभाष घई यांनी २००४ मध्ये प्रदर्शित झालेला हिट चित्रपट ‘ऐतराज’च्या सिक्वेलची घोषणा केली आहे. या चित्रपटाचे नाव ‘ऐतराज २’ असणार आहे. ‘ऐतराज’ला २० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सुभाष घई यांनी या चित्रपटाची घोषणा केली. ‘ऐतराज’ हा रोमँटिक थ्रिलर चित्रपट होता, ज्यामध्ये अक्षय कुमार, प्रियांका चोप्रा आणि करीना कपूर यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. हा चित्रपट १२ नोव्हेंबर २००४ रोजी प्रदर्शित झाला होता. अब्बास-मस्तान यांच्या जोडीने या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. मुक्ता आर्ट्स बॅनरखाली घई यांनी या चित्रपटाची निर्मिती केली होती. सुभाष घई यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून पोस्ट करत माहिती दिली की, ‘ऐतराज २’ची कथा पूर्णपणे तयार आहे. त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले, की आता मुक्ता आर्ट्स ‘ऐतराज २’साठी पूर्णतः तयार आहे. तीन वर्षांच्या मेहनतीनंतर या उत्कृष्ट पटकथेची निर्मिती केली आहे. जस्ट वेट अँड वॉच, असे त्यांनी आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये लिहिले आहे. घई यांनी आपल्या पोस्टमध्ये अभिनेत्री प्रियांका चोप्राच्या ‘ऐतराज’मधील सोनियाच्या भूमिकेच्या आठवणी सांगितल्या. प्रियांका ही भूमिका करण्यासाठी सुरुवातीला संकोच करत होती. सुभाष घई पुढे म्हणाले, की प्रियांका चोप्राने तिच्या अभिनयातून धाडस आणि सुंदरतेचे दर्शन घडवले. त्या पात्रातील तिची अदाकारी आज २० वर्षांनंतरही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. सुरुवातीला ती या भूमिकेसाठी संकोच करत होती, परंतु तिने



आत्मविश्वासाने या पात्राला न्याय दिला. या चित्रपटात अमरीश पुरी, अन्नू कपूर, परेश रावल, उपासना सिंग आणि विवेक शौक यांनीदेखील महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या होत्या. ‘ऐतराज’मध्ये प्रियांकाच्या अभिनयाची प्रेक्षक आणि समीक्षकांनी खूप प्रशंसा केली होती, ज्यामुळे ती चित्रपटसृष्टीत बरीच प्रसिद्ध झाली होती. या सिनेमात प्रियांकाने खलनायिकेचे पात्र साकारले होते. या चित्रपटामुळे तिला बॉलीवूडमध्ये खरी ओळख मिळाली होती, असे बोलले जाते.

## शॉर्ट न्यूज

### १८ फेब्रुवारीपर्यंत पशुगणना मोहीमेचे आयोजन

**नगर :** जिल्ह्यातील पशुंची गणना करण्याची मोहीम २८ फेब्रुवारीपर्यंत करण्यात येणार असून या मोहिमेत जनावरांची खरी माहिती पशुपालकांनी द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले आहे. जिल्ह्यात करण्यात या गणनेत गायवर्ग, म्हसवर्ग, शेळी-मेंढी, अश्व, वराह यांच्यासह बिल्ला मारलेल्या (टॅगींग केलेल्या) जनावरांची व भटक्या समुदायातील पशुधनाची गणनाही करण्यात येणार आहे.

### आ.रोहित पवारांना आत्मपरीक्षणाची गरज

**कर्जत :** कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघातील निवडणूकीत मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासून शेवटच्या फेरीपर्यंत उत्कंठावर्धक ठरलेल्या लढतीत आ. रोहित पवार यांनी आ. राम शिंदे यांचा अवघ्या १२४३ मतांनी पराभव केला. आ. राम शिंदे यांना भूमिपूत्र म्हणून असलेली सहानुभूती तारू शकली नाही, तर पवारांसाठी हा विजय आत्मपरीक्षण करणारा ठरला. आ. रोहित पवार व त्यांच्या कुटुंबीयांनी पाच वर्षे सतत मतदारांशी असलेली नाळ कायम ठेवताना, मतदारसंघात विविध विकासकामे कामे केली, पण महायुती सरकारच्या लाडकी बहिण योजनेने ही विकासकामे झाकोळली गेली.

### आंबडच्या सरपंचपदी बिनविरोध निवड

**अकोले :** तालुक्यातील राजकीयदृष्ट्या जागृत समजल्या जाणाऱ्या आंबड ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी सुरेखा हासे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच रेश्मा कानवडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा गटविकास अधिकारी विकास चौरे यांच्याकडे विधानसभा निवडणुकीपूर्वी सुपूर्द केला होता. गटविकास अधिकाऱ्यांनी कानवडे यांचा राजीनामा मंजूर केला होता. त्यामुळे प्रभारी म्हणून सरपंचपदाची जबाबदारी उपसरपंच नाथा भोर यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यामुळे सरपंचपदाच्या निवडीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला होता.

### छपराला लागलेल्या आगीत बाळ सुखरुप

**संगमनेर :** तालुक्यातील जांबुत बुः येथील देवराम मेंगाळ यांच्या घराला अचानक आग लागल्याची घटना काल मंगळवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. या आगीत मेंगाळ यांच्या संसार उपयोगी वस्तू जळून खाक झाल्या, तर छपरातील झोळीत झोपलेल्या लहान बाळाला वेळेत बाहेर काढल्याने अनर्थ टळला. याबाबत ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, साकूर पठार भागातील जांबुत बुः येथील वैतागवाडी या ठिकाणी देवराम आप्पाजी मेंगाळ सहकुटुंब राहतात. दररोज ते मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहे.

### पतीकडून पत्नीवर प्राणघातक हल्ला

**राहुरी :** नेहमीच्या वादातून पत्तीने पत्नीला जीवे मारण्याच्या उद्देशातून तिच्यावर चाकूने वार करत प्राणघातक हल्ला केल्याची घटना राहुरी तालुक्यातील मोमीन आखाडा परिसरात घडली. दरम्यान, या घटनेत पत्नी गंभीर जखमी झाली आहे. तिच्यावर पुणे येथे उपचार सुरू आहेत. तर पोलिस ठाण्यात पती, सासू व दिर तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी पतीचा पोलिस तपास करत आहेत. या घटनेची माहिती अशी की, मोमीन आखाडा (ता. राहुरी) येथील नारायण बाजीराव चव्हाण व मंदा नारायण चव्हाण यांच्यात गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू होता.

# धर्म टिकविण्यासाठी मुले संस्कारक्षम बनवा

### गुरुपुत्र चंद्रकांत मोरे यांचे प्रतिपादन । मेहंदुरीमध्ये सत्संग मेळावा

**अकोले : प्रतिनिधी**



**संस्कृती टिकली तर धर्म टिकेल, पण धर्म टिकवण्यासाठी मुले संस्कारक्षम बनवली पाहिजे, संस्कारी मुलेच संस्कृती टिकवतील त्यासाठी मुलांना आई वडिलांची सेवा करण्याची शिकवण दिली पाहिजे असे मत श्री स्वामी समर्थ केंद्र दिंडोरीचे गुरुपुत्र युवा संत चंद्रकांत दादासाहेब मोरे यांनी व्यक्त केले. अकोले तालुक्यातील मेहंदुरी येथे श्री स्वामी समर्थ मंदिर दरबार स्थापना दिनानिमित्त तालुकास्तरीय भव्य सत्संग मेळाव्यात दादासाहेब मोरे यांनी आपल्या अमृततुल्य वाणीतून भाविकांशी हितगुज साधले.आमदार डॉ.किरण लहामटे, अगस्तीचे संचालक अशोक आरोटे आदी मान्यवर उपस्थित होते.**

धर्माला ग्लानी येते तेव्हा देव अवतार घेतात, आज धर्म टिकवण्याची गरज असून ती आपली जबाबदारी आहे. त्यासाठी पुढील पिढ्या संस्कारीत बनवायला पाहिजे, आई वडिलांच्या सेवा करण्याची शिकवण त्यांना दिली पाहिजे, देवाची सेवा करून देव मिळेल की नाही हे सांगता येत नाही, परंतु आई वडिलांनाची सेवा केली तर देव नक्की मिळेल, अनाथ आश्रम, वृद्ध आश्रम बंद करायचे असेल तर मुलांवर संस्कारच महत्वाचे आहेत. वृद्धाश्रमात शेतकऱ्यांचे आई वडील नाही ही अतिशय सुखकारक गोष्ट आहे. शेतकरी वर्गाने संस्कार टिकवले असल्याचे चंद्रकांत मोरे यांनी सांगितले.

पुढे बोलताना मोरे म्हणाले की, जेथे विज्ञान संपते तेथे अध्यात्म सुरु होते, जो भाविक स्वामीचे चिंतन करतो तो चिंता मुक्त होतो, जेथे सगळे असमर्थ ठरतात तेथे फक्त स्वामी समर्थ ठरतात. जात, पात, धर्म, पुरुष, महिला असा कोणताही भेदभाव न करता त्यांचे दुःख निवारण विनामूल्य केले जाते असे केंद्र गावोगावी उभारून प्रत्येक घरात सेवेकरी निर्माण करायचा असल्याचेही मोरे म्हणाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका निरीक्षक प्रमोद वाकचौरे, जे. के. मालुंजकर, जगन्नाथ देशमुख, गणेश मादास,रामदास बोंबले,सविता कोटकर, प्रतीक्षा पावडे, सरपंच अमित येवले, तसेच केंद्रातील सर्व सेवेकऱ्यांनी विशेष प्रयत्न केले आहे.तसेच प्रचार प्रसारासाठी मादास आवाज गणेश मादास, लाईट डेकोरेशनसाठी भूषण आरोटे यांनी विशेष सहकार्य केले.यावेळी भाविक मोठया संख्येने भाविक उपस्थित होते.

# अमोल मिटकरींना पार्थ पवारांनी झापले

### माध्यमांना बाईट न देण्याचा दिला इशारा मिटकरींच्या लेखावरून वाद पेटला

**मुंबई : प्रतिनिधी**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेससाठी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कॅम्पेन करणाऱ्या डिझाईन बॉक्स कंपनीचे प्रमुख नरेश अरोरा यांनी निवडणुकीत मिळालेल्या यशाबद्दल अजित पवारांची भेट घेत शुभेच्छा दिल्या आहेत. मात्र, यावेळी नरेश अरोरा यांनी अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवल्याने वाद निर्माण झाला आहे. अमोल मिटकरी यांनी अरोरा यांना यावरून सुनावले आहे. या वादात अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांनी देखील उडी घेतली आहे.**



नरेश अरोरा यांनी अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवल्यावरून अमोल मिटकरी यांनी त्यांना चांगलेच सुनावले आहे. शेवटी तुम्ही पगारावरील शिपाई आहात, असा टोला मिटकरी यांनी लगावला होता. यावर पार्थ पवार यांनी अमोल मिटकरी यांना चांगलेच झापले आहे. तसेच मीडियाल बाईट सुद्धा द्यायचा नाही, असा इशारा देखील देण्यात आला आहे.

पार्थ पवार यांनी एक्सवर लिहिले की, अमोल मिटकरी हे राष्ट्रवादीचे आमदार असूनही पक्षाच्या भूमिकेविरुद्ध भूमिका घेत आहेत, हे दुर्दैवी आहे. नरेश अरोरा आणि डिझाईन बॉक्स संदर्भातील त्यांच्या वक्तव्याचा माझा पक्ष आणि माझे वडिल अजिबात समर्थन करत नाहीत. तसेच, मिटकरी यांनी याबाबत माध्यमांना प्रतिक्रिया देऊ नये, असा इशारा पार्थ पवार यांनी दिला आहे. हे ट्विट त्यांनी इंग्रजी भाषेत लिहिले आहे.

अमोल मिटकरी यांनी एका वृत्तपत्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या यशावर लेख लिहिला आहे. यात त्यांनी काही वादग्रस्त विधाने केली आहेत. तसेच अमोल मिटकरी यांनी नरेश अरोरा यांच्यावर टीका करत थेट तुम्ही पगारी शिपाई असल्याचे त्यात म्हंटले आहे. तसेच वर्तमानपत्रातील लेखात यशाचे डिझाईन राष्ट्रवादीचेच असा टोला त्यांनी लगावला आहे.

अजित पवारांच्या मिडिया कॅम्पेनिंगमध्ये नरेश अरोरा यांच्या डिझाईन बॉक्स कंपनीनेही पीआर एजन्सी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. अजित पवारांचे गुलाबी कॅम्पेन त्यांच्याच माध्यमातून करण्यात आले होते. त्यामुळे, आता विजयानंतर श्रेयवादाची लढाई पाहायला मिळत आहे. मात्र, या सगळ्यावर पार्थ पवारांनीच प्रतिक्रिया दिली असल्याने हा वाद मिटण्याची शक्यता आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत अजित पवारांनी लाडकी बहीण योजनेचा जोरदार प्रचार केला होता. तसेच त्यांचे कॅम्पेन देखील महाराष्ट्रात चांगलेच चालले असल्याचे दिसून आले आहे. या निवडणुकीत लाडकी बहीण योजनेचा अजित पवारांच्या पक्षाला चांगलाच फायदा झाला आहे. विधानसभा निवडणुकीत ५५ पैकी ४१ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला यश आले आहे.

महाराष्ट्रात आता महायुतीचे सरकार स्थापन करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या नेत्याला मुख्यमंत्री पदासाठी पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. तसेच महायुतीची उद्या दिल्ली येथे महत्त्वाची बैठक होणार असून, या बैठकीनंतर अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

# ईव्हीएम पडताळणीसाठी तनपुरे, वर्पेंचा यांचा अर्ज

### ४५ दिवसांनंतर पडताळणी केली जाणार

**नगर : प्रतिनिधी**

**नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राहुरी मतदारसंघातील संघातील पाच ईव्हीएम पडताळणीसाठी पराभूत उमेदवार प्राजक्त तनपुरे यांनी जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. तसेच कोपरगाव मतदार संघातील पराभूत उमेदवार संदीप वर्पे यांनी देखील एक मतदान केंद्रावरील पडताळणीसाठी अर्ज दाखल केला आहे.**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत पराभूत उमेदवारांना ईव्हीएम पडताळणी बाबत मागणी करता येते. यानुसार राहुरी मतदार संघातील नंबर दोनचे पराभूत उमेदवार प्राजक्त तनपुरे यांनी आज (बुधवारी)मतदारसंघातील पाच मतदार केंद्रावरील ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केला आहे. त्यासाठी त्यांनी एक मतदान केंद्रासाठी ४७ हजार २०० रुपये असे पाच केंद्राचे एकूण २ लाख ३६ हजार रुपये शुल्क भरले आहे. तसेच कोपरगाव मतदार संघातील पराभूत उमेदवार संदीप वर्पे यांनी देखील ईव्हीएम पडताळणी बाबत अर्ज दाखल केला आहे. यासाठी त्यांनी ४७ हजार २०० रुपये शुल्क प्रशासनाकडे भरले आहे. दरम्यान, निकाल लागल्यानंतर ४५ दिवसानंतर पडताळणी केली जाणार आहे.

# रात्रीच्या वेळी घरात घुसून चोरी करणारा आरोपी जेरबंद

### सापळा रचून आरोपी ताब्यात




**नगर : प्रतिनिधी**

**नगर शहरात रात्रीचे वेळी घरात घुसून चोरी करणारा आरोपी कोतवाली पोलिसांनी स्टेशन रोड परिसरात ताब्यात घेतला आहे. त्याच्याकडून दीड लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. संजय ज्ञानदेव धिवर (वय २९, रा.इंगळे वस्ती, रेल्वे स्टेशन अहिल्यानगर) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.**

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळालेल्या माहितीनुसार आरोपी चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी येत असल्याची खात्रीशीर माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले. ही कारवाई सहायक पोलीस निरीक्षक योगीता कोकाटे, सुनील भिंगारदिवे, योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, सतिष शिंदे, अतुल काजळे, दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू आदींनी केली.

**वाचकांच्या लेखणीतून**

# मूंछ नहीं तो कुछ नहीं!



मी त्यावेळी मुंबईतील बँक ऑफ इंडियाच्या मुंबई सेवा शाखेत नोकरी करीत होतो. शाखेतील कुणी अधिकारी किंवा अन्य कर्मचारी सेवानिवृत्त होई तेव्हा निरोप समारंभ होत असे. मला अशा प्रसंगी भाषण करण्याची आवड होती. त्यामुळे शाखेत कुणाच्याही निरोप समारंभात भाषण करणाऱ्यांत माझे नाव ठरून गेल्यासारखेच होते. अगदी विरोधी युनियनच्या एखाद्या मोठ्या लिडरच्या निरोप समारंभासाठीही मला बोलावून नेत असत. मी मराठी अथवा हिंदी भाषेतच भाषण करीत असे. तसा मी फार मोठा वक्ता होतो असे नाही. पण माझ्यावर सरस्वती प्रसन्न असे. (आजही आहे). शिवाय माझे भाषण विनोदी अंगाचे असे. एवढेच काय ते माझे भांडवल!

एक दिवस आमच्या शाखेत एका कर्मचाऱ्याच्या निरोप समारंभात मी भाषण केले. काही वक्त्यांची इंग्रजी भाषणे झाली. ती सारी ठरावीक साचाची आणि गंभीर प्रकृतीची होती. मग माझे नाव पुकारले गेले. माझे प्रास्ताविक बोलून झाल्यावर मी म्हणालो,

''भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कोटाला गुलाबाचं फूल खोचलेलं असे. आपल्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या डोईच्या काळ्या केसांमध्ये पांढऱ्या केसांची बट शोभून दिसे. या त्या त्या व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाच्या खुणा असतात.

''तसं आजच्या सेवानिवृत्त होणाऱ्या (नाव आठवत नाही) यांच्या मिशा लांबट, काळ्या कुळकुळीत आणि निमुळत्या असून टोकदारही आहेत. शिवाय आज त्यांना तेलही लावलेलं दिसतंय. त्यामुळे त्यांच्या केवळ मिशाच नव्हेत; तर त्यांचा चेहराही चमकदार दिसतोय. हा चमत्कार त्यांच्या मिशांचा! म्हणतात ना मूंछ है तो कुछ है. मूंछ नहीं तो कुछ नहीं!''

(हशा)

माझे विनोदी भाषण संपल्यावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, सहाय्यक प्रबंधक, सिंग साहेब यांनी मला मिठी मारली. म्हणाले, ''अच्छा हुआ. आपने माहौल हल्का (आनंदी) बना दिया!''

**नाना ढवळे, ८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# तुमच्या बापाच्या पापामुळे माझे मताधिक्य घटले

### महायुतीत असूनही राष्ट्रवादीने अपक्ष उमेदवार दिला । अदिती तटकरेंच्या टीकेला आमदार थोरवेंचे प्रत्युत्तर

**रायगड : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनिल तटकरे यांचा आणि शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्यातील वाद पुन्हा एकदा समोर आला आहे. महेंद्र थोरवे यांना पाडण्यासाठी राष्ट्रवादीचे नेते सुनिल तटकरे यांच्याकडून प्रयत्न झाल्याचा आरोप स्वत: थोरवे यांनी केला होता. यावर सुनील तटकरे यांच्या कन्या अदिती तटकरे यांनी पलटवार केला आहे. ते काठावर वाचले आहेत, त्यांनी विजयाची हवा डोक्यात जाऊ देऊ नये, असा टोला लगावला आहे.**



अदिती तटकरे यांनी टोला लगावल्यानंतर आता महेंद्र थोरवे यांनी देखील पुन्हा एकदा टीका करत प्रत्युत्तर दिले आहे. तुमच्या बापाच्या पापा मुळेच माझे मताधिक्य घटल्याचा आरोप थोरवे यांनी केला आहे. थोरवे म्हणाले, मी जे काही निवडून आलेलो आहे ते काही काठावर निवडून आलेलो नाही. याउलट तुमचेच जे काही आमदार निवडून आलेले आहे, ते काठावर निवडून आलेले आहे. मी ५,७०० मतांनी निवडून आलो आहे.

पुढे महेंद्र थोरवे म्हणाले, महायुती असताना सुद्धा राष्ट्रवादीने जो काही अपक्ष उमेदवार दिला, अश्या छुप्या पद्धतीने मला पडण्याचा प्रयत्न या मतदारसंघातून केला गेला. माझ मताधिक्य जे घटलेले आहे, ते पालकमंत्र्यांना सांगा, हे तुमच्या बापाचंच पाप आहे. माझ मताधिक्य तुमच्या बापामुळे घटलेले आहे. मी काठावर निवडून आलेलो नाही. खालापूर तालुक्यातील तांबाटी येथे एका नागरी सत्कारप्रसंगी पत्रकार परिषदेत बोलताना थोरवे यांनी तटकरे यांच्यावर टीका केली आहे. यामुळे महायुतीमधील या दोन आमदारांमध्ये चांगलेच मतभेद असल्याचे समोर आले आहे.

(पान १ वरून)

### महायुतीच्या नव्या सरकारमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी

या बैठकीत पक्षाच्या पुढील रणनीतीवर खल केला जात असल्याची माहिती आहे. या बैठकीनंतर अजित पवार दिल्लीत एका पत्रकार परिषदेलाही संबोधित करणार आहेत. त्यात ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारखेच भाजपच्या मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याला समर्थन देण्याची शक्यता आहे.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी बुधवारी आपण मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले. तसेच आपला भाजपच्या मुख्यमंत्र्याला पाठिंबा असल्याचेही स्पष्ट केले. शिंदे यांच्या माघारीमुळे फडणवीस यांचा मुख्यमंत्रीपदाच्या दिशेने जाणारा मार्ग अधिक सुकर झाल्याचे मानले जात आहे.

जा. क्र. पानपं/बांध/जाहिर आवाहन/1791/2024
पारनेर नगरपंचायत पारनेर
दि. 28/11/2024

**पारनेर नगरपंचायत पारनेर**
**जाहिर आवाहन**

पारनेर नगरपंचायत हददीतील सर्व नागरीकांना
ाहिर आवाहन करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय,
ब्ई यांच्या न्यायालयात दाखल झालेल्या जनहित
चिका क्र.७१/२०१३ पधील दिलेल्या निर्देशानुसार
रनेर नगरपंचायत हददीतील मुख्य रस्ते व इतर रस्ते
वरील खडडे, मॅनलोल्स व रस्ते खुदाईबाबतच्या तक्रारी
संकेतस्थळावर नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
ी मुंबई यांच्या मार्फत विकसित करणेत आलेल्या
ालीवरील तक्रार मोडयुलचा वापर करून तसेच या
लवर अथवा ०२४८८-२२१५५८ या क्रमांकावर
ध्वनीदवारे पारनेर नगरपंचायत कार्यालय येथे तक्रार
खल करता येईल. याकामी संजय दिनकर शिंदे
रनेर नगरपंचायत पारनेर मो क्र. ९३७०३५१३४२ हे
डल अधिकारी आहेत.

सही
**श्री विनय शिपाई**
मुख्याधिकारी,
पारनेर नगरपंचायत, पारनेर

# शिरूरमध्ये नोकरदाराला ऑनलाइन ८४ लाखांना गंडा!

## अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल । शिरूर पोलिसांचा तपास सुरू

**शिरूर : प्रतिनिधी**

**शिरूर शहरातील एका नोकरदाराला वेगवेगळी कारणे देऊन हे बँक अकाउंट आरबीआय अकाउंट अॅड होत असून तुमचे अकाउंटचे सर्व पैसे ट्रान्सफर करून व्हेरीफिकेशन झाल्यानंतर परत तुमचे पैसे परत तुमच्या अकाऊंटला जमा होतील, असे सांगून तब्बल ८४ लाख ३४ हजाराला गंडा घालण्यात आला आहे.**



प्रकाश विनायक धामणकर, (वय ४३ वर्षे, रा. बागवान नगर, शिरूर, ता. शिरूर, जि.पुणे, मुळ रा. चिंचाळा एम.आय.डी.सी ता. जि. चंद्रपुर) यांच्या तक्रारीवरून अज्ञात विरोधात शिरूर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरट्याने वेगवेगळी कारणे देऊन वेगवेगळ्या अकाउंटवर पैसे ट्रान्सफर करून घेण्यात आले आहे. आय.डी.बी.आय बँकेवरून आय बी आय बँक अॅप मध्ये २० लाख अमनकुमार या आय.डी. वर ट्रान्सफर केले. त्यानंतर फायनल स्टेप ऑफ व्हिरेफिकेशन या नावने मनपुरीया अॅग्रो या आयडी वर ११ लाख ७० हजार ट्रान्सफर केले व मला सांगितले डी.सी.पी. साहेब यांनी सांगितले आहे की, म्युचल व शेअर्स मध्ये पैसे असल्याने तुमचे व्हिरीफिकेशन पूर्ण होत नाही.

त्यानंतर त्यांना म्युचल फंड व शेअर्स मार्केटचे शेअर्स विकण्यास सांगितले. म्युच्युअल फंड मधील पैसे काढले व शेअर्स मार्केटचे शेअर्स विकुन ३९ लाख ८४ हजार एवढे आय. सी. आय सी. आय बँकेत घेतले व त्यानंतर अपेक्षा हॉस्पिटल या आय.डी. वर २० लाख रुपये, तसेच लताज रेली या आयडी वर ६ लाख ८४ हजार, तसेच महेंद्र बिस्नो या अकाउंटवर १० लाख रुपये, धिरेंद्र या आयडीवर ३ लाख ट्रान्सफर करून घेतले. त्यानंतर त्यांनी सांगितले की, तुमचे आज शेवटचे व्हिरीफिकेशन आहे. पर्सनल लोन काढावे लागेल असे सांगितले.

तुम्ही पर्सनल लोनकरीता ऑप्लीकेशन करा असे सांगितल्याने ऑनलाईन नंतर पर्सनल लोन आयसीआय बँकेने लो १२ लाख लोन मंजूर केले व पेंगीया डीजीट या आयडीवर ११ लाख ८० हजार ट्रान्सफर करुन घेतले तसेच पेंडिया डिजीट या आयडीवर १ लाख रुपये असे वेगवेगळ्या अकाउंट वरुन तब्बल ८४ लाख ३४ हजार रुपये पाठविण्यास सांगून ऑनलाईन फसवणुक करण्यात आली, अशी फिर्याद प्रकाश विनायक धामणकर यांनी शिरूर पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून शिरुर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# ज्ञानगंगा स्कुलमध्ये मेजर ध्यानचंद क्रीडा महोत्सव

## विद्यार्थी व पालकांच्या विविध स्पर्धा

**सुपा : प्रतिनिधी**

**शिरुर येथील ज्ञानगंगा इंटरनॅशनल स्कूलमध्ये नुकताच तीन दिवशीय मेजर ध्यानचंद क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**




या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन गंगा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रो.डॉ. राजेराम घावटे यांच्या हस्ते व उपाध्यक्ष दीपक घावटे, सचिव सविता घावटे, संचालक सुधीर शिंदे, संचालक प्रसाद घावटे, संचालिका अमृता घावटे, सीईओ डॉ. नितीन घावटे यांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन व क्रीडा ज्योत प्रज्वल करुन करण्यात आले. पहिले दोन दिवस सर्व विद्यार्थ्यांच्या व तिसऱ्या दिवशी सर्व पालकांच्या क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये कबड्डी, खो खो, लंगडी, रस्सीखेच, धावणे, लांब उडी, दोरी उडी, चमचा लिंबू यासारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

मुलांना उत्तम दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचा अनुभव मिळावा या उद्देशाने या क्रीडा स्पर्धांचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले.विद्यालयाचे प्राचार्य गौरव खुटाळ, उपप्राचार्या शोभा अमाप, क्रीडा शिक्षक संदीप पवार ,सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने या स्पर्धा निकोप व आनंददायी वातावरणात संपन्न झाल्या.

शिरूर तालुका क्रीडा शिक्षक संघाचे अध्यक्ष शरद दुर्गे व आदर्श क्रीडा शिक्षक ज्यांनी असंख्य राज्य, देश पातळीवर खेळाडू घडविले ते संदीप घावटे यांच्या शुभहस्ते विजेते खेळाडू व पालकांना मेडल प्रदान करुन पारितोषिक वितरण सोहळा संपन्न झाला.

## आ.दाते यांचा संभाजीनगर मित्रमंडळाच्या वतीने सत्कार



**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर - नगर विधानसभा मतदारसंघात महायुती व मित्रपक्षाचे अधिकृत उमेदवार काशीनाथ दाते ( सर ) मोठ्या अटीतटीच्या निवडणूकीत निवडून आल्याबद्दल संभाजी नगर मित्र मंडळाच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी विशेष सत्कार करण्यात आला.**

यावेळी मंडळाचे सदस्य मेहबूब राजे, नियाज राजे, नितीन शिंदे, सुनील गाडगे, रियाज राजे, शहाजी थोरात, किरण कुबडे, अजय घोंगडे, राजेन्द्र खोसे, अय्याज राजे, महेश ठुबे, गणेश घोंगडे, अक्षय घोंगडे, तुषार कुबडे, अभिनंदन घोलप, शिवाजी दाते, ऋषिकेश फंड, राकेश नगरे, नंदकुमार आढाव, बळवंत औटी, निलेश सोनवणे, इमरान शेख, आवेज राजे, जुनेद राजे, रेहान राजे, रवींद्र औटी, गणेश काजळे, वहाब राजे, सुनील शेळके, हर्ष थोरात, विक्रांत गाडगे आदी उपस्थित होते.

# सहकारमहर्षी वराळ पाटील यांचे विकासासाठी मोठे योगदान

## उपसरपंच माऊली वरखडे यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांनी विकासासाठी मोठे योगदान दिले असून बिनविरोध निवडीची परंपरा कायम ठेऊन वराळ पाटील यांनी एक आदर्श निर्माण केला असल्याचे प्रतिपादन उपसरपंच माऊली वरखडे यांनी व्यक्त केले आहे.**

सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांची पुण्यतिथी निघोज सोसायटी सभागृहात साजरी करण्यात आली यावेळी ते बोलत होते. सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी उपाध्यक्ष शांताराम लाळगे, माजी चेअरमन अनंतराव वरखडे, माजी उपाध्यक्ष वसंतराव ढवण, सचिव रामदास भोसले, संचालक दत्तात्रय लंके, दिलीप कवाद,असिम हवालदार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबासाहेब वराळ, मुलिका पाणीवापर संस्थेचे संस्थापक रामदास लंके, विष्णू लोखंडे, माजी संचालक केरु उचाळे, किसनराव वरखडे, डॉ. निवृत्ती पानमंद, संचालिका मनिषा वराळ आदी तसेच सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपसरपंच वरखडे यावेळी म्हणाले गेली सत्तर वर्षांच्या कार्यकाळात वराळ पाटील यांनी साठ वर्षे बिनविरोध निवडीची परंपरा कायम राखीत निघोजचा नावलौकिक जिल्ह्यात केला आहे. विकासाबरोबरच समन्वय साधून वराळ पाटील यांनी जनतेला न्याय मिळवून दिला असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांच्या पुतळ्यास सोसायटीचे अध्यक्ष सुनिल वराळ, उपाध्यक्ष शांताराम लाळगे व संचालक मंडळ व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव रामदास भोसले यांनी केले शेवटी संचालक मनिषाताई वराळ यांनी आभार मानले.

# आ. दातेंच्या विजयाने हुकुमशाही मोडीत निघणार

## राहुल शिंदे पाटील यांचा विश्वास

**निघोज : प्रतिनिधी**



**पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात आमदार काशिनाथ दाते सर आमदार झाल्याने हुकुमशाही मोडीत निघणार असून येत्या पाच वर्षांत महायुती सरकारच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार असल्याची ग्वाही भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील यांनी दिली आहे.**

गुणोरे येथे विजयी मिरवणूक व नेतेमंडळींचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी युवा नेते विजूभाऊ औटी, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन पाटील वराळ, राळेगण थेरपाळ सरपंच पंकज कारखिले, युवा नेते राजेश गोपाळे, पांडुरंग बढे,मच्छिंद्र मेसे,यादव गोपाळे, संपतराव सालके, बाळासाहेब गोपाळे,बन्सी बढे,भाऊसाहेब बढ़े,मनसुख बढ़े,उत्तम बढ़े,दत्ता बढ़े,शिवम बढ़े,युवराज बढ़े,सीताराम बढ़े,हिम्मत बढ़े,राधुजी साळवे,प्रवीण ढवळे,विकास साळवे,प्रकाश इंगळे,तात्याभाऊ राऊत,विनोद गोपाळे,आश्रम गोपाळे,रोहिदास मेसे,शरद गोपाळे,ज्ञानदेव करखिले सर,ऋषीकेश गोपाळे, रतन करखिले,संकेत बढे तुषार बढ़े,दौलत गोपाळे,शुभम गोपाळे,अविनाश करखिले,प्रतीक गोपाळे,ऋषिकेश मेसे,मनोज गोपाळे,श्रावण गोपाळे , संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, पैलवान सुभाष वराळ आदी यावेळी उपस्थित होते.


शिंदे यावेळी म्हणाले गेली पाच वर्षात विधानसभा सदस्यांनी मोठ्या प्रमाणात दादागिरी करीत जनतेवर हुकुमशाही आणली होती. म्हणून जनतेने ही हुकुमशाही मोडीत काढीत दाते सर यांना आमदार केले. युतीचे सरकार मोठ्या मताधिक्याने आल्याने केंद्र सरकार माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळणार असून आमदार काशिनाथ दाते सर यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मतदारसंघात विकासकामे होणार असल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली आहे.

युवा नेते विजूभाऊ औटी यांनी खासदार लंके यांच्यावर जोरदार टीका टिप्पणी केली. खऱ्या अर्थाने लोकशाही मतदारसंघात नांदणार असून हुकुमशाही करणाऱ्यांना जनतेने कायमचे घरी बसवले असून पारनेरची जनता हुशार असून माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश गोपाळे यांनी केले. शेवटी ज्ञानदेव कारखिले सर यांनी आभार मानले.

# मांजरसुंभा किल्ल्यासाठी प्रस्ताव!

## संरक्षित स्मारक घोषित करण्याचा प्रस्ताव



**नगर : प्रतिनिधी**

**अहिल्यानगर शहरापासून छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर १९ किमी अंतरावर असलेल्या अहिल्यानगर तालुक्यातील मांजरसुंभा गावात मांजरसुंभा नावाचा छोटेखानी किल्ला आहे. ऐतिहासिक मांजरसुंभा किल्ल्याच्या संवर्धनासाठी राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची प्रस्ताव राज्य पुरातत्व विभाग राज्य सरकारकडे पाठवणार आहे.**

किल्ल्यासह परिसरातील जमिनीची अद्ययावत भू राजस्व मालकी हक्क पत्रकाची माहिती पुरातत्व विभागाने जिल्हा प्रशासनाकडे मागवली आहे.छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील, अहिल्यानगर तालुक्यातील मांजरसुंभा गडाला ऐतिहासिक महत्त्व आहे. सद्यस्थितीत स्मारकाची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली निदर्शनास येते. स्मारकाचे तातडीने संवर्धन करणे आवश्यक आहे.

संवर्धन हे पुरातत्वीय संकेतानुसारच होणे अपेक्षित आहे. त्यासाठी सर्वप्रथम स्मारकास राज्य संरक्षित करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्मारकाचा राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करायचा आहे. त्याअनुषंगाने ऐतिहासिक महत्त्व व संवर्धनाची निकड लक्षात घेऊन स्मारकाचे अद्ययावत भूराजस्व माहिती, मालकीहक्क पत्र, नकाशा व टोचनकाशासह राज्य पुरातत्व कार्यालयाच्या नाशिक विभागाकडे पाठवावे. नगर ट्रेकर्स फाउंडेशनचे सुरज कपाळे यांनी केलेल्या पाठपुराव्यानुसार राज्य पुरातत्व विभागाने हे पत्र पाठवले आहे.

# अहमदनगर क्लबमध्ये चोरी

## ३५ हजारांचा ऐवज लंपास




**नगर : प्रतिनिधी**

**अहमदनगर क्लब मधील दोन खोल्याचे कडीकोयंडा व कुलूप तोडून ३५ हजार ५०० रूपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना मंगळवारी (ता. २६) रात्री साडेबारा ते सकाळी सातच्या दरम्यान घडली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.**

दिगंबर ध्यानसिंग रावत (वय ५३ रा. हिंदुस्तान मोटारच्या पाठीमागे, शक्तीनगर, सोलापूर रस्ता, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे.

मंगळवारी रात्री साडेबारानंतर चोरट्यांनी अहमदनगर क्लब मधील दोन खोल्याचे कडीकोयंडा व कुलूप तोडून आत प्रवेश केला. तेथील सामानांची उचकापाचक करून टेनिसचे रॅकेट, दोन इलेक्ट्रीक एम्प्लीफायर मशीन, चॅनल मिक्सर इलेक्ट्रीक मशीन,२५० वॅटचे इलेक्ट्रीक मशीन व एक माईक, हॅलोजन एलईडी लाईट पाच, एक शिलाई मशीन असा सुमारे ३५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. सदरची घटना सकाळी सात वाजता लक्ष्यात आली. त्यानंतर फिर्यादी यांनी भिंगार कॅम्प पोलिसांना माहिती दिली. सहायक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली असून गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार डी. व्ही. झरेकर करत आहेत.

# शाळांना अद्ययावत करणाऱ्यावर भर देणार

## आमदार काशिनाथ दाते यांची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**



**तालुका हा शिक्षकांचा तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील शिक्षणाचा दर्जा अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी शाळांना अद्य यावत,सोयीयुक्त,डिजिटला ईकरणाऱ्यावर आमचा भर राहणार आहे.या अनुषंगाने तालुक्यातील शाळांचे सर्वेक्षण करणार असल्याचे मत आमदार काशिनाथ दाते यांनी केले.**

आ.दाते म्हणाले,सर्वेक्षण करून शाळांच्या सोयी सुविधांबाबत शासकीय स्तरावर,सामाजिक संस्था,औद्योगिक क्षेत्रातील विविध कंपनीचा सी.एस.आर फंड निधीतुन कसे काम करता येईल याचा प्राधान्यक्रम ठरविला जाईल.तालुक्यात शिक्षणाचा दर्जा उंचावला पाहिजे, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी वाचनालयांची परिस्थिती,इमारत परिस्थिती याबाबत माहिती घेऊन शासन दरबारी निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.अधिकारी स्तरावर माहिती मागवून घेणार आहे याबरोबरच काही संस्थांमार्फत शिक्षित तरुणांची फळी उभी करून सर्वेक्षण करून त्या अनुषंगाने काम करणार आहे.

२५ वे पुण्यस्मरण

तू आमच्या आचार,विचार
आणि वर्तनात चिरंतन आहेस



कै.सौ.मीराताई मुरलीधर रोहोकले

जनरल बॉडी सदस्या रयत शिक्षण संस्था
पहिल्या महिला सरपंच भाळवणी
स्व.दि.२९/११/१९९९

दुःखांकित :
श्री.मुरलीधर रोहोकले (दादा)
सौ.संध्या भांड | डॉ.अर्चना वखारे
श्री.अशोक (बबलू) रोहोकले | सौ.पोर्णिमा शिंदे
सौ.अश्विनी गुंजाळ | सौ.दिपाली दावभट
श्री.संतोष रोहोकले | श्री.पुष्कर रोहोकले

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com